0 1 AUG 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून एका दिवसात ११.५१ लाख लिटर पाणीपुरवठा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


शिवाजी विद्यापीठामार्फत शुक्रवारी (दि. ३०) एका दिवसात शहराला ११.५१ लाख लिटर इतका उच्चांकी पाणीपुरवठा करण्यात आला.

महापुरामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये विद्यापीठाने गेल्या रविवारपासून दररोज शहर व परिसराला महानगरपालिका प्रशासनाच्या सहकार्यातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. याअंतर्गत दररोज सरासरी सव्वातीन लाख पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र, शहरवासीयांची पाण्याची गरज भागविण्यासाठी विद्यापीठाने काल क्रीडा अधिविभागाशेजारील रुसा विहीर क्र.२ ला आणखी एक पंप वाढविला. त्या विहिरीतून पाच हॉर्सपॉवरच्या पंपांच्या सहाय्याने दोन पॉईंटवरून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. यामुळे ७४ वाहनांच्या माध्यमातून तेथून ८ लाख ८८ हजार लिटर पाणी पुरविण्यात आले.

विद्यापीठाच्या जल शुद्धीकरण प्रकल्पाजवळील भरणा केंद्रातून तीस वाहनांतून २ लाख ६३ हजार लिटर पाणी पुरविण्यात आले. त्यामुळे एका दिवसांत विद्यापीठ शहराला ११ लाख ५१ हजार लिटर इतके उच्चांकी पाणी पुरवू शकले. पाणीपुरवठ्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आयुक्त कादंबरी बलकवडे, अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, सहायक आयुक्त विनायक औंधकर यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या जलपुरवठा विभागाचे मिलिंद जाधव आणि कर्मचारी, विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे अधिकारी व कर्मचारी सक्रिय योगदान देत आहेत.

## जनावरांसाठी चारा..

विद्यापीठ मुक्या जनावरांसाठी परिसरातील गवत चारा म्हणूनही उपलब्ध करीत आहे. सुमारे शंभर पशुपालक शेतकऱ्यांनी ५५ मोटारसायकली, तीन ट्रॅक्टर्स, दोन रिक्षा, तीन एपे रिक्षा, दोन जीप ट्रॉली आणि चार बैलगाड्यांतून चारा नेल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली.



शिवाजी विद्यापीठातून...

0 1 AUG 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने पुरविले ११ लाखांवर लिटर पाणी

## शहरातील पाणीबाणीच्या काळात भागविली तहान

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवार (ता. ३०) दिवसात शहराला ११.५१ लाख लिटर इतका उच्चांकी पाणीपुरवठा केला. महापुरामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये विद्यापीठाने रविवारपासून दररोज शहर व परिसराला महानगरपालिका प्रशासनाच्या सहकाऱ्यातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास सुरवात केली आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाकडील विहिरीतून केलेल्या पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अभियांत्रिकी विभागाचे अधिकारी, कर्मचारी.

याअंतर्गत दररोज सरासरी सव्वातीन लाख पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र, शहरवासीयांची पाण्याची गरज भागविण्यासाठी विद्यापीठाने काल क्रीडा अधिविभागाशेजारील रुसा विहीर क्रमांक २ ला आणखी एक पंप वाढविला. त्या विहिरीतून दोन पाच हॉर्सपॉवरच्या पंपांच्या साहाय्याने दोन पॉईंटवरून पाणीपुरवठा सुरू केला. यामुळे एकूण ७४ वाहनांच्या माध्यमातून तेथून एकूण ८ लाख ८८ हजार लिटर पाणी पुरविले. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या जल शुद्धीकरण प्रकल्पाजवळील भरणा केंद्रातून तीस वाहनांतून २ लाख ६३ हजार लिटर पाणी पुरविले. त्यामुळे काल एका दिवसांत विद्यापीठ शहराला ११ लाख ५१ हजार लिटर इतके उच्चांकी पाणी पुरवू शकले. जनावरांसाठी परिसरातील गवत चारा म्हणूनही उपलब्ध करत आहे. काल सुमारे शंभर पशुपालक शेतकऱ्यांनी ५५ मोटारसायकल, तीन ट्रॅक्टर्स, दोन रिक्षा, तीन ॲपे रिक्षा, दोन जीप ट्रॉली आणि चार बैलगाड्यांतून चारा नेला आहे.